udyan- -

**सोलापूर महानगरपालिका**

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/१३७६
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि. ०७/११/२०१७

**-: जाहिरात :-**

**WALK - IN- INTERVIEW**

**दि. १४/११/२०१७, वेळ दुपारी - १२.३० वाजता.**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकरिता उद्यान प्रमुख (उद्यान अधिक्षक) व तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in- Interview व्दारे करार पध्दतीने खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | उद्यान प्रमुख | १ (एक) | B.Sc- Agriculture, B.Sc- Horticulture, B.Sc- Botany, B.Sc- Forestry **OR** Post Graduate in any of this subject With two years experience in Government, semi Government, Local Self Goverment Service.<br>Post Graduate and Candidate with more experience will be given preference | एकवट मानधन रुपये ३०,०००/- यावर अकरा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. अकरामहिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

**शर्ती व अटी :-**

१) वयोमर्यादा :- दि.०१/०६/२०१७ रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये.उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.

४) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन करून घेण्यात येईल.

५) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

६) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

७) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

udyan- -

९) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

१०) सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार पत्र करुन दयावे लागेल.

११) इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

१२) सदरचे जाहिरात सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.gov.in व www.solapurcorporation.org या संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

**आयुक्त,**

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

udyan- -

**सोलापूर महानगरपालिका**

**उद्यान अधिक्षक या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करिता**

**खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.**

१) सदरची नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर राहील. सदरचे करार पत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून दयावे लागेल.

२) सदर पदावरील नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधीकरिता असून पूर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील. नियुक्तीस अकरा महिन्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही.

३) याकामी करारपध्दतीने दरमहा रुपये ३०,०००/- इतके एकवट मानधन दिले जाईल.

४) आपली नियुक्तीही सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील सर्व उद्यान(बागा), प्राणीसंग्रहालय, आयलॅन्डस, कांरजे, नौका विहार, स्टेडियम इत्यादीवरील त्याअनुषंगीक कामे व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणेची आहे. तसेच याशिवाय वरिष्ठ अधिका-याकडून वेळोवेळी सांगतील ती कामे व कर्तव्ये पार पाडावी लागतील.

५) सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही. व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६) नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा,पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. आपली नियुक्तीही करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर आहे.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

८) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा मला हजर करणे बंधनकारक आहे. ....

९) सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१०) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट वेतन (पगाराची) रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक आहे.

११) आपण सादर केलेली कागदपत्राच्या सत्येतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल

**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**